## ९) व्यक्तिश: कर्जे :-

### १) कायम ठेव पावती तारण कर्जे :-

ठेवीदारांना त्यांचे आकस्मित कारणासाठी किंवा थोड्या दिवसाचे गरजेसाठी तात्पुरत्या स्वरुपात पैशाची गरज भासते. अशावेळी ठेव पावती मुदतीपूर्वी मोडावी लागली तर, ठेवीदारांचे नुकसान होते. अशा तात्पुरत्या गरजेसाठी ठेवीदाराला ठेव तारण कर्ज उपलब्ध करुन देणेचे बँकेचे खालीलप्रमाणे धोरण आहे.

१ ठेवीदाराने ठेवलेल्या ठेवीवर (कायम ठेव, दाम दुप्पट, दाम दिडपट व रिकरींग अशा स्वरुपाच्या ठेवी) ८५ % ठेव तारण कर्ज देणेत यावे.

२ ठेव तारण कर्जास ठेवीवरील व्याज दरापेक्षा २ % जादा व्याजदराने व्याज आकारणी करणेत यावी.

३ ठेव तारण कर्ज देतेवेळी ठेव पावती /पावतया बेची करुन बँकेच्या ताब्यात राहतील.

४ मासिक उत्पन्न ठेवीवरील मासिक व्याज हे ठेव तारण कर्जामध्ये जमा करणेत येईल.

५ ठेव तारण कर्ज व ठेवीची मुदत एकाच दिवशी संपत असेल तर त्याच दिवशी ठेव मोडून कर्जाची परतफेड करुन घेणेत येईल.

६ संयुक्त ठेवीदारांनी कर्जाबाबतची  कागदपत्रे  संयुक्त सहयांनी पूर्ण करणेची आहेत.